उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा लाभ महाडीबीटी पोर्टलद्वारे थेट लाभार्थ्यांना देण्याकरीता महाआयटी यांनी सन २०१८-१९ मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या आय.टी. असिस्टंट या सेवांच्या मानधनाची रक्कम सन २०१९-२० मधील मंजूर तरतूदीतुन अदा करण्यास मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : अर्थसं-२०१९/प्र.क्र.७८/१९/मशि-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०९ सप्टेंबर, २०१९.

वाचा : संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१८-१९/डीबीटी/११२६२, दिनांक ३०.०८.२०१९.

प्रस्तावना :

राज्य शासनाने शासकीय योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांना पोहविण्यासाठी विकसीत केलेले महाडीबीटी पोर्टल माहे ऑगस्ट,२०१८ मध्ये कार्यान्वित करण्यात आले आहे. सन २०१८-१९ मध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी प्रथमच महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने करण्यात आली असल्याने पात्र विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविणे, महाविद्यालय व विभाग स्तरावरुन अर्जांची छाननी करणे, शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांचे देयक काढण्यासाठी अलॉटमेंट उपलब्ध करुन देणे तसेच पीएफएमएस प्रणालीद्वारे पात्र विद्यार्थ्याचे आधार संलग्न बँक खात्यामध्ये शिष्यवृत्तीचे वितरण करणे, या कार्यवाही दरम्यान येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यासाठी महाआयटी कार्यालयाकडून माहे ऑक्टोबर, २०१८ ते मार्च, २०१९ या कालावधीसाठी जिल्हा तसेच विभाग स्तरावर आय.टी. असिस्टंट यांच्या सेवा घेण्यात आल्या होत्या. सदर आय.टी. असिस्टंट यांच्या मानधनाच्या खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सन २०१८-१९ मध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा लाभ महाडीबीटी पोर्टलवरुन पात्र विद्यार्थ्यांपर्यत पोहचविण्यासाठी येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करणेकरीता महाआयटी यांनी माहे ऑक्टोबर, २०१८ ते मार्च, २०१९ या कालावधीसाठी उपलब्ध करुन दिलेल्या आय.टी.असिस्टंट यांच्या मानधनासाठी येणारा रु.५२,८९,५३३/- (अक्षरी रुपये बावन्न लक्ष एकोणनव्वद हजार पाचशे तेहेतीस फक्त) इतका खर्च सन २०१९-२० मधील मंजूर तरतूदीतुन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या बाबींवर होणारा खर्च ““मागणी क्र.डब्लू-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण,८००, इतर खर्च (०२)(०९) ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लक्ष पेक्षा अधिक नाही अशा विद्यार्थ्यांना फी माफी (२२०२ १४५६) ३१ सहाय्यक अनुदाने” या लेखाशिर्षाखालील सन २०१९-२० मध्ये उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ०८.०७.२०१९ मधील अटी व शर्तीनुसार निर्गमित करण्यात येत असून सदर शासन परिपत्रकातील अटींची पूर्तता होत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९०९१४५५४५६३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Hemantkumar
Pandharinath
Baviskar

Digitally signed by Hemantkumar Pandharinath Baviskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=71de9bdf8c28541d92a5cd36d722315bab7f006ec5420633722d42e0976d82a8, serialNumber=284a4236ae7795d36dd2ecb5ac6ca70c333a3cf1b13f66828d224ae2026b37e9, cn=Hemantkumar Pandharinath Baviskar
Date: 2019.09.09 15:03:02 +05'30'

(हे.पं. बाविस्कर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. महालेखापाल लेखा वअनुज्ञेयता,महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
३. महालेखापाल लेखापरीक्षा,महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
५. कार्यासन (साशि-१/मशि-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. निवड नस्ती,कार्यासन मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.